# १० वा वर्धापन दिन

**पतसंस्था परिवार** या मासिकास सहकार महर्षी व बहुजनांचे नेते, महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री, पद्मभूषण स्व. वसंतदादा पाटील यांच्या जयंतीच्या दिवशी म्हणजेच १३ नोव्हेंबर २०१० रोजी यशस्वीपणे १० वर्षे पुर्ण झालेली आहेत.

वर्धापनदिनाच्या दिवसाचा सलगपणे हा १२० वा अंक आहे. **पतसंस्था परिवार** या मासिकाची मुहुर्तमेढ १३ नोव्हेंबर २००० रोजी झाली. आणि तेव्हापासून हे मासिक अत्यंत विश्वासाने व जिद्दीने अखंडीतपणे मुंबईसह महाराष्ट्र राज्यात सहकारी कार्यकर्त्यांपर्यंत दरमहा पोहचविण्यात आले. प्रतिमहा १५००० सहकारी कार्यकर्ते व सरकारी अधिकारी व हितचिंतकांसाठी **पतसंस्था परिवार** न चुकता नियमितपणे गेली १० वर्षे आम्ही प्रकाशित करीत आहोत. आणि ह्याच मासिकाच्या माध्यमातून सहकारी पतसंस्थांची चळवळ व विविध प्रकारची माहिती व प्रामुख्याने सहकार खात्याचे व शासनाचे विविध आदेश, परिपत्रके, जी आर व कायद्यातील बदल हे वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे अभुतपुर्व काम ''पतसंस्था परिवारने'' केलेले आहे.

**'पतसंस्था परिवार'** मासिकाचा ''संपादक'' या नात्याने मी स्वत: न चुकता अग्रलेख आपल्या सेवेशी सादर केलेला आहे. प्रत्येक महिन्यात शेकडो वाचकांनी **पतसंस्था परिवार**मधील या अग्रलेखाबद्दल व अन्य माहितीबद्दल उत्स्फुर्त दाद दिलेली आहे. आणि हिच उर्जा आणि आशिर्वाद घेवून ''पतसंस्था परिवार'' आगेकूच करीत आहे.

**स्व. वसंतदादा पाटील यांनी ज्यासाठी अट्टाहास केला होता,** त्यांची थोडीशी जबाबदारी **पतसंस्था परिवार** दादांच्या स्मरणार्थ बजाविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत आहे. कायदा बनविणारे व कायद्याची अंमलबजावणी करणारे व ज्यांच्यासाठी कायदा आहे, त्या जनतेबद्दल वेळोवेळी **पतसंस्था परिवार**च्या माध्यमातून स्पष्ट विचार मांडताना दादांचीच आठवण झालेली आहे. सहकार कायदा, बँकींग रेग्युलेशन ॲक्ट, आर.बी.आय. ॲक्ट व नाबार्ड ॲक्ट याची सरकारी अधिकारी व शासन कशी पायमल्ली करते, यावर उघडपणे आवाज उठविण्याचे काम व सहकारी कार्यकर्त्यांना झोपेतून जागे करण्याचे काम **पतसंस्था परिवार** करीत आलेला आहे. आणि ह्याची फलश्रूती काही प्रमाणात सहकारातील कार्यकर्ते व सरकारी अधिकारी व प्रामुख्याने लेखापरिक्षक यांच्यावर झाल्याचे वेळोवेळी सिध्द झालेले आहे.

जेष्ठ समाजसेवक **अण्णासाहेब हजारे यांनी सहकारातील शोषणाच्या विरोधात** वेळोवेळी आवाज उठविताना **पतसंस्था परिवार** या मासिकातून यापुर्वीच मांडलेल्या विचारांची अंमलबजाणी होत असताना आम्हांस दिसली आहे. महाराष्ट्रा सारख्या एकाच राज्यात सहकारी संस्थांना वेगवेगळे लेखापरीक्षण शुल्क खंडणीसारखे वसुल करणारे संवेदनहिन राज्यकर्ते अजुनही वठणीवर आलेले नाहीत. **पतसंस्थांमधील ठेवी व त्यावरील व्याज तसेच सहकारी साखर कारखान्यांमधील शेतकऱ्यांच्या ठेवी व त्यावरील व्याज याबाबत शासनाची भुमिका वेगवेगळी राहिलेली आहे.** कायद्याचा वापर संशयीतीत आहे. पतसंस्थांमधील कार्यकर्ते याप्रकरणी जेलमध्ये डांबण्याचे काम या सरकारने केले परंतु सहकारी साखर कारखान्यांच्या संचालकांना सरकारने जेलमध्ये डांबण्याच्या ऐवजी त्यांचेवर हजारो कोटी रुपयांचे खैरात शासनाने केली. कायदा हातात घेऊन **मंत्री समिती** नावाची संकल्पना उदयास आणली. ज्या समितीच्या अस्तित्वाबद्दल कुठेही वैधानिक आधार नाही. आणि या समितीने म्हणजेच मुख्यमंत्री, सहकार मंत्री, अर्थमंत्री, साखर आयुक्त व सहकार आयुक्त यांनी एकत्रितपणे सहकारी साखर कारखान्यांवर मंत्री समितीच्या माध्यमातून जनतेचे पैसे उधळले. साखर कारखानदारांनी हे पैसे देणगी म्हणून अक्षरश: लुटले. शेतकऱ्यांच्या १६ हजार कोटींच्यावरील ठेवी व त्यावरील व्याज काही अपवाद वगळता सर्व साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांना मुदत संपली तरी दिली नाही. आणि मायबाप सरकार याबाबत

ज्येष्ठ समाजसेवक आण्णा हजारे यांच्या आंदोलनाला सुद्धा न जुमानता जनतेवर अन्यायच करीत राहीले आहेत. **पतसंस्था परिवार** या मासिकातून ज्या **महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर** यांनी देशाची घटना लिहीली, आणि ह्या संविधानाचा ज्यांनी ज्यांनी अपमान केला, अशांना नजीकच्या भविष्यकाळात **पतसंस्था परिवार** मासिकाच्या माध्यमातून खुलेआम जाब विचारला जाईल. आणि स्व. वसंतदादा पाटील यांच्याच भाषेत बोलायचे झाले तर अशा ''**नाठाळांच्या माथी सोटा हाणण्याचे काम**'' **पतसंस्था परिवार** आपण आतापर्यंत दिलेला प्रतिसाद व सहकार्याच्या माध्यमातून पार पाडील.

**पतसंस्था परिवार ११ व्या वर्षात** आजपासून पर्दापण करीत आहे. पतसंस्था परिवार चे वर्गणीदार, जाहीरातदार व हितचिंतकांनी असेच प्रेम व विश्वास भविष्यातही ठेवावा व आपल्या सर्वांची सेवा या माध्यमातून करण्याची संधी पुन्हा पुन्हा द्यावी, यासाठी **पतसंस्था परिवार** च्या १० व्या वर्धापन दिनाच्या दिवशी अत्यंत नम्रपणे निवेदन करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**